**ठळक बातम्या**

- दक्षिण आफ्रिकेत जोहान्सबर्ग इथं सुरु असलेल्या जी ट्वेंटी नेत्यांच्या शिखर परिषदेचा आज समारोप, प्रधानमंत्री मोदी तिसऱ्या सत्राला संबोधित करणार

- संयुक्त राष्ट्रांच्या हवामान परिषदेत हवामान कराराच्या मसुद्यावर जागतिक नेत्यांचं एकमत

- सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई आज सेवानिवृत्त होणार

- ब्राझीलचे माजी राष्ट्राध्यक्ष याईर बोल्सनरो यांना अटक

**आणि**

- दृष्टीहीन महिलांच्या टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतासमोर विजयासाठी ११५ धावांचं आव्हान

**<><><><><>**

दक्षिण आफ्रिकेत जोहान्सबर्ग इथं सुरु असलेल्या जी ट्वेंटी नेत्यांच्या शिखर परिषदेचा आज समारोप होईल. या परिषदेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सर्वांसाठी समन्यायी भविष्य - अत्यावश्यक खनिजे, योग्य काम आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या संकल्पनेवर आधारित शिखर परिषदेच्या तिसऱ्या सत्राला संबोधितही करतील. या सत्राआधी ते भारत-ब्राझील-दक्षिण आफ्रिका अर्थात इब्सा या त्रिपक्षीय मंचाच्या बैठकीला उपस्थित राहतील.

आज शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर, प्रधानमंत्री मोदी दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष सिरील रामाफोसा, जपानचे प्रधानमंत्री सनाई टाका, कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी आणि इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी यांच्यासोबत द्विपक्षीय बैठका घेणार आहेत. त्यानंतर, ते संध्याकाळी मायदेशासाठी रवाना होतील.

दरम्यान, या परिषदेसाठी जोहान्सबर्ग इथं पोहचल्यावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अनेक जागतिक नेत्यांची भेट घेतली. ब्रिटनचे प्रधानमंत्री किएर स्टार्मर, मलेशियाचे प्रधानमंत्री अन्वर इब्राहिम, फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन, जर्मनीचे चान्सलर फ्रेडरिक मेर्झ, दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष ली जे-म्युंग, ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष लुईझ इनासिओ लुला दा सिल्वा आणि संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांची त्यांनी

भेट घेतली. प्रधानमंत्री मोदींनी सिएरा लिओनचे राष्ट्राध्यक्ष ज्युलियस माडा बायो आणि सिंगापूरचे प्रधानमंत्री लॉरेन्स वोंग यांच्याशीही संवाद साधला.

या भेटींमधून जागतिक प्रगती आणि समृद्धीसाठीची सामायिक वचनबद्धता भारतानं पुन्हा एकदा व्यक्त केल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

या परिषदेच्या आयोजनाबद्दल आणि उत्साही स्वागताबद्दल प्रधानमंत्र्यांनी दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष सिरील रामाफोसा यांचे आभारही मानले आहेत.

<><><><>

भारत, ऑस्ट्रेलिया आणि कॅनडा या तीन देशांनी तंत्रज्ञान आणि नवोन्मेष क्षेत्रातली एक नवीन त्रिपक्षीय यंत्रणा अर्थात भागीदारी व्यवस्था घोषित केली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बनीज आणि कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी यांच्या काल जोहान्सबर्ग इथे जी २० शिखर परिषदेच्या निमित्ताने झालेल्या भेटीनंतर ही घोषणा करण्यात आली. या भागीदारी व्यवस्थेमुळे तंत्रज्ञान आणि नवोन्मेष क्षेत्रात सहकार्य वाढीस लागेल, असं प्रधानमंत्री मोदी यांनी समाजमाध्यमांवर म्हटलं आहे.

या अंतर्गत हरित ऊर्जा, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि महत्वाच्या खनिजांसाठी पुरवठा साखळ्या या क्षेत्रांमध्ये सहकार्य मजबूत होण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जाणार आहेत. जी २० च्या माध्यमातून जागतिक स्तरावर आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवण्याच्या भारताच्या प्रयत्नांचा हा एक भाग असून येत्या वर्षात मार्च अगोदर या तिन्ही देशांच्या प्रतिनिधींची संयुक्त बैठक होणं अपेक्षित आहे.

<><><><>

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी आज युक्रेनचे परराष्ट्र व्यवहार मंत्री अंद्री सीबीहा यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. रशिया-युक्रेन संघर्ष थांबवण्याबाबत भारताचा पाठिंबा असल्याचा पुनरूच्चार जयशंकर यांनी यावेळी केला.

<><><><>

ब्राझीलमधल्या बेलेम इथे सुरु असलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या हवामान परिषदेत अर्थात ‘कॉप ३०’ मध्ये अखेरीस हवामान कराराच्या मसुद्यावर सर्व जागतिक नेत्यांचं एकमत झालं आहे. गेले दोन आठवडे सुरू असलेल्या या परिषदेच्या समाप्तीनंतरही काल रात्रभर लांबलेल्या चर्चेनंतर हा मसुदा तयार झाला असला तरीही त्यात जीवाष्म इंधनाचा वापर

कमी करण्यासाठी पुरेशा उपाययोजना मात्र समाविष्ट नाहीत. हवामानसंबंधित व्यापार नियमांचा आढावा घेण्याचं तसंच विकसित देशांनी विकसनशील देशांना नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्यासाठी पुरेसा वित्तपुरवठा करण्याचं आवाहन या मसुद्यात करण्यात आलं आहे.

पॅरिस करारात ठरलेल्या तापमान वाढीच्या मुद्द्यावर सर्व नेत्यांनी पुन्हा एकदा सहमती दर्शवली असून ब्राझील कराराचा मसुदा म्हणजे हवामान कृतीच्या दिशेने टाकलेलं महत्वाचं पाऊल असल्याचं मसुद्यात म्हटलं आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या परिषदेला अमेरिकेचा एकही प्रतिनिधी पाठवला नव्हता.

**<><><><><>**

गोव्यात पणजी इथं सुरू असलेल्या इफ्फी अर्थात ५६व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा आजच्या चौथ्या दिवशी जगभरातील विविध चित्रपट तसंच कार्यक्रमांची मेजवानी प्रेक्षकांना मिळणार आहे.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही इफ्फी महोत्सवात *ICFT UNESCO* गांधी पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. अनुपम खेर यांचा तन्वी द ग्रेट हा सिनेमा या पुरस्कारासाठीच्या स्पर्धेत आहे. तसंच आज अनुपम खेर आज ‘हार मानणं हा पर्याय नाही’ या विषयावर मास्टरक्लास घेणार आहेत.

**<><><><><>**

देशाचे विद्यमान सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई आज सेवानिवृत्त होणार आहेत. आज संध्याकाळी गवई आपल्या पदावरून मुक्त होतील आणि त्यानंतर न्यायमुर्ती सुर्यकांत पदभार स्वीकारतील. न्यायमूर्ती सुर्यकांत उद्या देशाचे ५३ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतील. न्यायमूर्ती सुर्यकांत पुढचे १५ महिने देशाचे सरन्यायाधीश म्हणून काम पाहतील, आणि वयाची ६५ वर्षे पूर्ण झाल्यावर ९ फेब्रुवारी २०२७ ला ते निवृत्त होतील.

हरियाणात हिसार जिल्ह्यात एका मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेल्या न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी वकील म्हणून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली होती. २०११ मध्ये त्यांनी कुरुक्षेत्र विद्यापीठातून कायद्यातील पदव्युत्तर पदवी प्राप्त केली होती. पंजाब आणि हरयाणा उच्च न्यायालयातही त्यांनी न्यायदानाची जबाबदारी सांभाळली होती, तसंच ते काही काळ हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती म्हणून कार्यरत होते.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून  कलम ३७० रद्द करणं, तसंच अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि नागरिकत्व हक्कांवरील प्रकरणं, बिहारमधील मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षणासंदर्भातील प्रकरणाच्या सुनावणीत त्यांचा सहभाग होता.

सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनसह बार असोसिएशनमधील एक तृतीयांश जागा महिलांसाठी आरक्षित करण्यातही त्यांनी योगदान दिलं होतं.

<><><><><>

ब्राझीलचे माजी राष्ट्राध्यक्ष याईर बोल्सनरो यांना राजधानी ब्राझिलिया इथे पोलिसांनी प्रतिबंधात्मक अटक केली आहे. सध्याच्या सरकारविरोधात कारस्थान केल्याच्या आरोपावरून ४ ऑगस्टपासून गृहकैदेत असलेल्या बोलसनरो यांना फेडरल सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार अटक झाली असून २७ वर्ष ३ महिन्यांच्या कैदेची शिक्षा झाली आहे. ते २०१९ ते २०२२ दरम्यान राष्ट्राध्यक्षपदावर कार्यरत होते.

<><><><><>

भारत आणि इस्त्रायल या दोन्ही देशांच्या व्यापारी समुदायाला लवकर लाभ मिळावा यासाठी केंद्र सरकार प्रस्तावित मुक्त व्यापार करार दोन टप्प्यात लागू करण्याच्या विचारात असल्याची माहिती केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी दिली आहे. भारत आणि इस्त्रायलने गेल्या गुरुवारी करारासाठी औपचारिक वाटाघाटी सुरू करण्यासाठी अटींवर स्वाक्षरी केली. या अटींमध्ये करशुल्क आणि करमुक्त अशा प्रकारचे अडथळे दूर करून विविध वस्तुंसाठी, गुंतवणुकीचं तसंच सीमाशुल्क प्रक्रियांचं सुलभीकरण, नवोन्मेष आणि तंत्रज्ञान क्षेत्रात सहकार्य वाढवणं, सेवा क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी नियम शिथील करणं यांचा समावेश आहे.

<><><><><>

श्रीलंकेत कोलंबो इथं आज भारत आणि नेपाळ यांच्यात पहिल्या दृष्टीहीन महिला ट्टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेचा अंतिम सामना सुरु आहे. या सामन्यात नेपाळनं भारताला विजयासाठी ११५ धावांचं आव्हान दिलं आहे. त्याआधी भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला होता. भारतानं नेपाळच्या आघाडीच्या फळीला झटपट बाद केलं. त्यानंतर, बिमला राय आणि सरिता घिमिरे याच्या भागिदारीनं नेपाळचा डाव

सावरला. त्यामुळं नेपाळला निर्धारित २० षटकांत ५ खेळाडू गमावून ११४ धावा करता आल्या.

**<><><><><>**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात गुवाहाटी इथं सुरु असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात, दक्षिण आफ्रिकेनं आपल्या पहिल्या डावात ४०० धावांचा टप्पा ओलांडला आहे.

आज सामन्याच्या दुसऱ्या दिवशी दक्षिण आफ्रिकेनं आपला पहिला डाव ६ बाद २४७ धावांवरून पुढे सुरु केला. काल नाबाद असलेल्या सेनुराय यानं या मालिकेतलं पहिलं शतक झळकावत दक्षिण आफ्रिकेला मजबूत स्थिती गाठून दिली आहे. सेनुरान यानं आधी काईल याच्यासोबत आणि त्यानंतर मार्को यान्सन याच्यासोबत अर्धशतकी भागिदारी करत दक्षिण आफ्रिकेला चारशे धावांचा टप्पा गाठून दिला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा पहिल्या डावात दक्षिण आफ्रिकेच्या ७ बाद ४२८ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या मंत्रालयातले स्वीय सचिव अनंत गर्जे यांची पत्नी गौरी पालवे यांनी काल संध्याकाळी मुंबईतल्या आपल्या राहत्या घरी गळफास लावून घेतल्याचं पोलिसांनी म्हटलं आहे. अनंत गर्जे हे पशुसंवर्धन आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांचे स्वीय सचिव म्हणून कार्यरत आहेत. गौरी पालवे सरकारी रुग्णालयात दंतरोगतज्ज्ञ म्हणून काम करत होत्या. त्यांचं गर्जे यांच्याशी फेब्रुवारी महिन्यात लग्न झालं होतं. ते पत्नीचा मानसिक आणि शारीरिक छळ करत असल्याने गौरी यांनी हे पाऊल उचलल्याचा आरोप पालवे कुटुंबीयांनी केला आहे.

**//<><><><><>//**